**महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई वरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: उसाअ-२०२०/प्र.क्र.०२/का-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १५ जानेवारी, २०२०.

**वाचा**:- १. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.उसाअ २०१४/प्र.क्र.२३३/ कार्यासन -४, दि.३१.०८.२०१५.
२. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.उसाअ २०१८/प्र.क्र.२९६/ कार्यासन-५, दि.०८.०८.२०१९.

**प्रस्तावना**:-

राज्यामध्ये उर्दू भाषेचा विकास, भाषेचे संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारिक आदान-प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची प्रथमत: स्थापना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ईयुए-१०७५/एल-जेजे, दि.१६.०४.१९७५ अन्वये करण्यात आली होती. तद्नंतर महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची वेळोवेळी पुनर्रचना करण्यात आली आहे. संदर्भ क्र.१ व २ येथील शासन निर्णयाद्वारे सदर अकादमीवर नियुक्त करण्यात आलेल्या अशासकीय सदस्य/ कार्याध्यक्ष यांच्या नियुक्त्या रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय**:-

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई वर संदर्भ क्र.१ व २ येथील शासन निर्णयाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या खालील अशासकीय सदस्य/ कार्याध्यक्ष यांच्या नियुक्त्या या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. मुशफ्फी अहमद सिद्दीकी उर्फ डॉ. राणा, राहणार मिरा रोड, जि. ठाणे | कार्याध्यक्ष |
| २ | श्रीमती कमरुन्निसा सईद, हूर विल्ला, पहिला माळा, मराठा मंदिर सिनेमासमोर, मुंबई-सेंट्रल, मुंबई-८ | सदस्य |
| ३ | श्री. रफीक ए. शेख, ३/१९, जमात चाल, मस्जिद जवळ, मोगापाडा, अंधेरी (पूर्व), मुंबई-६९ | सदस्य |
| ४ | श्रीमती एजाज फातेमा पाटणकर, नावेरी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी | सदस्य |
| ५ | श्री. काझी इरशोद्दीन रशीदोद्दीन, बिलाल उर्दू प्राथमिक शाळा, हमालवाडी, स्टेशन रोड, परळी-वैजनाथ, जि. बीड | सदस्य |
| ६ | श्री. अस्लम तन्वीर कवी, पो. नसिराबाद, ता. जि. जळगांव | सदस्य |
| ७ | श्री. शेख हनीफ शेख रशीद, सावदा, ता. रावेर, जि. जळगांव | सदस्य |
| ८ | श्री. अब्दुल मजीद अब्दुल हमीद शेख (छोटा मजीद शोला), देसाईगंज, वळसा, गडचिरोली | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. मसुद ऐजाज, खिलाफत हाऊस, जफरनगर, पांढरकवडा रोड, यवतमाळ | सदस्य |
| १० | श्री. अझीम राही, साखरखेडा, बुलढाणा | सदस्य |
| ११ | श्री. फारुक सय्यद, ३२१/४४, मुस्लिम पच्छा पेठ, सोलापूर-५ | सदस्य |

२. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई वरील उपरोक्त अशासकीय सदस्य/ कार्याध्यक्ष यांच्या नियुक्त्या हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून रद्द होतील.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२००११५१७२७४५५६१४ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Suhas Madhukar Kshirsagar
Date: 2020.01.15 17:22:15 +05'30'

**( सु. म. क्षीरसागर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई.
२) सर्व मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य,
३) मा. राज्यपाल यांचे सचिव,
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५) मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव,
६) मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव,
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
९) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०) मा. मुख्य सचिव, यांचे सह सचिव,
११) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१४) संचालक, लेखा व कोषागरे (संगणक कक्ष), नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७) सर्व अशासकीय सदस्य/ कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
१८) सह सचिव/ उप सचिव, सर्व अवर सचिव, कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२०) अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
२१) निवडनस्ती (कार्या. ५)